ORIGINAL ARTICLE
ISSN:-2230-7850
Indian Streams Research Journal

सांराश :-

१ ऑगस्ट १९६२ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामुळे उद्योजकांना मुबलक प्रमाणात पायाभूत सोयी-सुविधांची उपलब्धता होते. परंतू औद्योगिकरणाची गती आणि रोजगार निर्मितीच्या बाबतीत ठाणे जिल्ह्यातील एम.आय.डी.सी.ला मर्या दित यश मिळाले आहे. ठाणे जिल्ह्यातील एम.आय.डी.सी.च्या स्थापनेला ६२ वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतू क्लिष्ट कार्यपध्दती आणि महामंडळाला दिलेले सीमांत अधिकार त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योजकांना पर्याप्त प्रमाणात मदत करू शकत नाही. म्हणून महामंडळाने आपल्या कामात सातत्य ठेवावे असे केल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिकरणाची गती वाढविण्याचे आणि रोजगार निर्मितीचे एक प्रभावी साधन ठरू शकेल. महाराष्ट्राला 'देशाचे ग्रोथ इंजिन' करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे एकमेव प्रभावी साधन ठरू शकेल.



गायत्री राजपालसिंह राजपूत

पीएच.डी. संशोधिका (अर्थशास्त्र) पूणे विद्यापीठ

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची ठाणे जिल्हाच्या औद्योगिक विकासातील भूमिका



### 1.प्रस्तावना :

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भापावार प्रांतरचना करून राज्याची निर्मिती झालेली दिसते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, यावेळी मुंबईचा काही प्रमाणात औद्योगिक विकास झालेला होता. त्याला १०० वर्षांची परंपरा होती. राज्याचा विकास करायचा तर उद्योगांचे विकेंद्रीकरण गरजेचे होते याची जाणीव पहिले मुखमंत्री यशवंतराव चव्हाण यांना झाली. राज्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर उद्योगांशिवाय पर्याय नाही. ग्रामीण व मागास भागांत उद्योगांचे जाळे उभारूनच हे शक्य होईल याचा त्यांनी विचार केला. राज्य उद्योगाभिमूख होण्यासाठी महाराष्ट्राच्या जन्मापासून त्यांनी उद्योगपुरक धोरण आखायला सुरुवात केली. त्यामुळे महाराष्ट्राचे आजचे उद्योगक्षेत्रातील स्थान अढळ आहे. देश-विदेशातील गुंतवणूक राज्यात होऊन राज्य उद्योगात अग्रेसर राहीले आहे. राज्यनिर्मिती होऊन चार महिनेही झाले नव्हते, त्यावेळ‍ यशवंतराव चव्हाण यांनी १ ऑक्टोवर १९६० रोजी श्री. एस.जी. वर्वे (I.C.S.) यांच्या अध्यक्षतेखाली 'Board of Industrial Development (BID)' ची स्थापना केली. औद्योगिक विभागाकडून आलेल्या अनेक शिफारशींचा विचार करून विकासाच्या संदर्भात अनेक शिफारशी करण्यात आल्या. हे मंडळ झपाटयाने कामाला लागले व राज्याच्या उद्योगाचा आराखडा त्यानुसार तयार केला गेला. संपूर्ण राज्याचा भौगोलिक व इतर अभ्यास करून प्रदेशात कोणते उद्योग उभारता येतील याची माहिती तयार केली. राज्याचे उद्योग धोरण हा राज्याचा प्रमुख भाग आहे. तो कायमस्वरूपी व्यवस्थेचा भाग व्हावा म्हणून या मंडळाने 'Maharashtra Industrial Act महाराष्ट्र उद्योग कायदा' मंजूर केला. राज्याच्या सर्व उद्योगाभिमुख धोरणाचा समावेश या कायद्यात करण्यात आला. पुढे या कायद्याच्याच आधारे १ ऑगस्ट १९६२ रोजी 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली. अशा प्रकारचा उद्योग व कायदा महामंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले. Board of Industrial Development -BID हे महाराष्ट्र राज्य विकास महमंडळाचे प्रथम शक्ती स्थान म्हणून ओळखले गेले.

### २ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा ठाणे जिल्हातील प्रारंभ

महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून औद्योगिक क्षेत्रात सर्वात अग्रेसर राहीले आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी अंगिकारलेले विकासाभिमूख धोरण व त्यांचा भविष्यवेध दृष्टिकोन याचे हे फलीत आहे. राज्यनिर्मितीनंतर लगेचच यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक प्रगतीचा पाया घालणारी धोरणे स्वीकारली. राज्याचा औद्योगिक विकास साध्य झाल्याशिवाय आर्थिक व सामाजिक वदल घडून येणार नाही याची त्यांना पूर्ण जाणीव होती. म्हणून प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने एक तरी औद्योगिक क्षेत्र स्थापन केले आहे. ठाणे जिल्ह्यात ब्रिटीश काळातच रेल्वे सुरू झाली होती. म्हणजेच ठाणे जिल्ह्यात स्वातंत्र्यापूर्वीच दळणवळणाच्या सोयींचा विकास झाला होता. जिल्ह्यात उद्योगधंद्याची स्थापना व्हावी आणि त्यांचा जलद गतीने वाढ आणि विकास व्हावा या उद्दिष्टातुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना संविधानाच्या १९६१ च्या कायद्यान्वये झाली. राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना १ ऑगस्ट १९६२ साली झाली. तेव्हाच मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली याच दिवशी वागळे इस्टेट - ठाणे जिल्ह्यात औद्योगिकरणासाठी आवश्यक अशा योजना महामंडळाने आखल्या आहेत. मुंवई- ठाणे-पुणे हा राज्याचा औद्योगिक विकासाचा स्वर्णिम त्रिकोण आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर या तिन्ही जिल्ह्यात मोठे भांडवली उद्योग, यांत्रिक व रासायनिक उद्योग प्रस्थापित झाले. अधिक भांडवल व गुंतवणूकीमुळे या तिन्ही जिल्ह्यात कारखान्यांची वाढ झाली आहे. याला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रयत्नच जवाबदार आहेत.

### ३ ठाणे जिल्हातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची उद्दिष्टे

१. जिल्ह्यात औद्योगिकरणास चालना देणे.
२. औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी जमीन संपादन करून तिचा विकास करणे.
३. जिल्ह्यातील उद्योजकांना त्यांच्या मागणीनुसार उद्योग प्रस्थापित करण्यासाठी जमिन वाटप करणे.
४. उद्योजकांना स्वस्त दरात भूखंड, तयार गाळे उपलब्ध करून देणे.
५. कमी प्रमाणात औद्योगिकरण झालेल्या भागामध्ये उद्योग उभारणीस उद्योगांना आणि उद्योजकांना चालना देणे.
६. जिल्ह्यातील उद्योजकांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज व इतर आवश्यक सुविधा पूरविणे.
७. इतर अनुषंगिक सेवा व सुविधा पूरविणे.

### ४ ठाणे जिल्हातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची कार्ये

ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक विकास साधण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्य करीत असते.

१. कारखाना उभारण्यासाठी विकसित प्लॉटस पूरविणे.
२. रस्ते, पाणी, जलनि:सारण, पथदिवे या सोयी पूरविणे.
३. समुद्र किनाऱ्यालगतच्या भागात रासायनिक उद्योगांच्या उभारणीसाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे.
४. वँका, पोस्ट, दूरध्वनी, पोलीस, अग्निशमन, आरोग्य, हॉस्पिटल, कँटिन, दुकाने यांच्या सोयी पूरविणे.
५. तंत्रज्ञ, लघुलेखक यांच्यासाठी तयार गाळे पूरविणे.
६. औद्योगिक क्षेत्रात निवासाच्या सोयी पूरविणे.
७. औद्योगिक नागरी विभागासाठी पाणीपूरवठयाच्या योजना हाती घेणे.
८. शासनाच्या वतीने औद्योगिक विकास प्रकल्प हाती घेणे त्यासाठी विकास केंद्र स्थापन करणे.
९. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात लघु औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे.

१० . जिल्ह्यात पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न करणे .

## ५ ठाणे जिल्हातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापनात आणि प्रशासन

ठाणे जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय वागळे इस्टेट- ठाणे येथे असून राज्य शासनाने नियुक्त केलेल्या संचालक मंडळामार्फत या महामंडळाचे व्यवस्थापन करण्यात येते . उपमुख्याधिकारी हे जिल्ह्यातील महामंडळातील कामकाजावर नियंत्रण ठेवत असतात . या अधिकाऱ्यामार्फत संचालक मंडळातील इतर सदस्य महामंडळाचे कामकाज करत असतात .

ठाणे जिल्ह्यातील १५ तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत १३ ठिकाणी औद्योगिक क्षेत्रे स्थापन करण्यात आली आहेत . म्हणजे ठाणे जिल्ह्यात १३ ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत . या महामंडळाच्या कामकाजाच्या सोयीसाठी ठाणे जिल्ह्यातील तालुक्यांची तीन भागात वाटणी करण्यात आली आहे . या तीन भागांत विभागणी केल्यानंतर जिल्ह्यातील १३ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची तीनच कार्यालये जिल्ह्यात आहेत .

विभागिय कार्यालय क्र . १
विभागिय कर्यालय क्र . २
विभागिय कार्यालय क्र . ३

अशी त्यांची नावे आहेत . या तिन्ही विभागांचे मुख्यालय वागळे इस्टेट ठाणे येथे आहे . प्रत्येक विभागातील सहाय्यक कार्यकारी अधिकारी हे आपल्या विभागाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवत असतात .

ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या कामगिरीचा आढावा पुढील तक्त्यांमध्ये घेतलेला आहे .

## ६ ठाणे जिल्हातील विकसित भूखंडाचे क्षेत्रफळ

तक्ता क्र . १ .१ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत २०१०-११ या वर्षात ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राखालील विकसित भूखंडाचे क्षेत्रफळ दर्शविलेले आहे . उद्योजकांना नवीन उद्योगांसाठी जमिनी विकसित करून पुरविणे हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्य आहे . तक्ता क्र . १ .१ मधील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, २०१०-११ मध्ये ठाणे जिल्ह्यात एकूण १३ एम . आय . डी . सी . अस्तित्वात आहेत . या १३ एम . आय . डी . सी . साठी ठाणे जिल्ह्यातून २०१०-११ मध्ये एकूण ५६८४ .९५ हेक्टर्स इतके धारणक्षेत्र संपादित करण्यात आले होते . त्यापैकी या १३ एम . आय . डी . सी . साठी ५६७३ . २४ हेक्टर्स इतके धारणक्षेत्र विकसित करण्यात आले . प्रत्येक तालुक्यातील एम . आय . डी . सी . साठी प्रति चौ . कि . मी . ला धारणक्षेत्राचा दर वेगवेगळा होता . तक्ता क्र . १ .१ मधील आकडेवारीवरून असे दिसून येते की, २०१०-११ ला ठाण्यातील औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २५२ . ३६ हेक्टर्स धारण क्षेत्र संपादित केले आणि तेवढेच विकसितही केले होते . २०१०-११ मध्ये ठाण्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक धारणक्षेत्राचा दर प्रति चौरस कि . मी . ला १३५७० रूपये इतका होता . त्याचप्रमाणे २०१०-११ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ठाणे जिल्ह्यातील ठाणे -तुर्भे खाडी (T.T.C.) किंवा महापे या भागासाठी सर्वात जास्त म्हणजे २३३३ . २७ हेक्टर्स इतके धारणक्षेत्र संपादित केले होते आणि तितकेच विकसितही केले होते . या भागातील प्रति चौ . कि . मी . ला धारणक्षेत्राचा दर सर्वात जास्त म्हणजेच १५९६० रूपये इतका आहे . कारण या भागातील औद्योगिक क्षेत्राला मुबलक पाणीपुरवठा, वीजपुरवठयाच्या सोयी-सुविधा आहेत . तसेच येथून दळणवळणाच्या सोयी-सुविधांचाही अधिक प्रमाणात विकास झाला आहे . म्हणून महापे या भागातील औद्योगिक क्षेत्राचा दर सर्वात जास्त आहे .

### तक्ता क्र . १ .१
### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत ठाणे जिल्हातील विकसित भूखंडाचे क्षेत्रफळ (२०१०-११)

| अ . क्र . | औद्योगिक क्षेत्राचे नाव | संपादित धारणक्षेत्र (हेक्टर्स) | विकसित धारणक्षेत्र (हेक्टर्स) | प्रती चौ . कि . मी . ला धारणक्षेत्राचा दर (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ . | ठाणे | २५२ . ३६ | २५२ . ३६ | १३५७० |
| २ . | तारापूर आणि अतिरिक्त तारापूर | १०२८ . ५४ | १०२८ . ५४ | २३५५ |
| ३ . | डोंबिवली | ३५७ . २७ | ३५७ . २७ | १०१८० |
| ४ . | मीरा | ७ . ८२ | ७ . ८२ | ६६५० |
| ५ . | अंबरनाथ (अंबरनाथ-बदलापूर रोड) | २२८ . ४९ | २२८ . ४९ | २६६० |
| ६ . | अंबरनाथ (आनंदनगर) | ५०७ . ४७ | ५०४ . ४७ | २६९५ |
| ७ . | अतिरिक्त अंबरनाथ (बोहोनोली) | ५०६ . ६४ | ५०३ . २२ | २६६० |
| ८ . | बदलापूर | १०१ . १० | ९९ . ८० | २६६० |
| ९ . | कल्याण- भिवंडी | ४८ . १६ | ४८ . १६ | १९९५ |
| १० . | अतिरिक्त कल्याण- भिवंडी | ४४ . २७ | ४४ . २७ | १९९५ |
| ११ . | मूरबाड | १३० . ७१ | १३० . ७१ | ९३५ |
| १२ . | अतिरिक्त मूरबाड (खूदावली) | १३८ . ८५ | १३४ . ८६ | ९३५ |
| १३ . | ठाणे - तुर्भे खाडी (T.T.C.) | २३३३ . २७ | २३३३ . २७ | १५९६० |
| | एकूण | ५६८४ . ९५ | ५६७३ . २४ | - |

स्रोत : MSME Development Institute, Ministry of MSME, Govt. of India, Andheri(E), Mumbai, Page No. 7.

### ७ ठाणे जिल्हातील विकसित औद्योगिक भूखंडांची संख्या

तक्ता क्र. १.२ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक भूखंडांची संख्या दर्शविली आहे. उद्योजकांना विकसित भूखंडांचे वाटप करणे हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महत्वाचे कार्य आहे. ठाणे जिल्ह्यात ठाणे, तारापूर आणि अतिरिक्त तारापूर, डोंबिवली, मिरा, अंबरनाथ (अंबरनाथ- बदलापूररोड), अंबरनाथ (आनंदनगर), अतिरिक्त अंबरनाथ (बोहोनोली), बदलापूर, कल्याण- भिवंडी, अतिरिक्त कल्याण - भिवंडी, मुरबाड, अतिरिक्त मुरबाड (खुदावली), ठाणे -तुर्भे खाडी (T.T.C.) या १३ एम. आय.डी.सी. आहेत. या १३ औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २०१०-११ मध्ये एकूण १०४२९२ भूखंड विकसित केले होते. त्यापैकी या १३ औद्योगिक क्षेत्रांना १०१०५६ एवढे भूखंड वितरित करण्यात आले होते. या ठाणे जिल्ह्यातील १३ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक क्षेत्रात एकूण ८४५१ उद्योग उत्पादनात कार्यरत आहेत.

तक्ता क्र. १.२
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत ठाणे जिल्हातील औद्योगिक भूखंडांची संख्या

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | विकसित भूखंडांची एकूण संख्या | वितरित औद्योगिक भूखंडांची संख्या | शिल्लक औद्योगिक भूखंडांची संख्या | उत्पादनात कार्यरत उद्योग घटकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | ठाणे | ८२७ | ७३७ | ९० | ६३३ |
| २. | तारापूर आणि अतिरिक्त तारापूर | ७१५८८ | ७०१०९ | १४७९ | १७६० |
| ३. | डोंबिवली | २१४६८ | १९९१५ | १५५३ | १५१४ |
| ४. | मीरा | ४६४७ | ४६४७ | ० | ३७ |
| ५. | अंबरनाथ (अंबरनाथ- बदलापूर रोड) | २९१ | २९० | १ | २५० |
| ६. | अंबरनाथ (आनंदनगर) | ८४६ | ८२३ | २३ | ७१७ |
| ७. | अतिरिक्त अंबरनाथ (बोहोनोली) | ३ | ३ | ० | ०१ |
| ८. | बदलापूर | ३७४ | ३३१ | ४३ | २७४ |
| ९. | कल्याण- भिवंडी | ३३ | ३३ | ० | २० |
| १०. | अतिरिक्त कल्याण- भिवंडी | २ | २ | ० | ०१ |
| ११. | मूरबाड | २१७ | २०२ | १५ | १७२ |
| १२. | अतिरिक्त मूरबाड (खूदावली) | ३०३ | ३०० | ३ | २६० |
| १३. | ठाणे - तुर्भे खाडी (T.T.C.) | ३६९३ | ३६६४ | २९ | २८१२ |
| | एकूण | १०४२९२ | १०१०५६ | ३२३६ | ८४५१ |

स्रोत : MSME Development Institute, Ministry of MSME, Govt. of India, Andheri(E), Mumbai, 2000-01 and 2010-11 Report.

### ८ ठाणे जिल्हातील औद्योगिक क्षेत्रंचे उत्पादन

तक्ता क्र. १.३ मध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण १३ औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक क्षेत्राचे उत्पादन दर्शविले आहे. २०००-०१ मध्ये ठाण्यातील औद्योगिक क्षेत्राचे उत्पादन ३६१४९० मेट्रीक टन इतके असून ते २००९-१० मध्ये ४१२२७००० मेट्रीक टन इतके उत्पादन झाले होते. सर्वात जास्त उत्पादन ठाणे - तुर्भे खाडी या औद्योगिक क्षेत्राचे असून ते ५७६१६००५० मेट्रीक टन इतके आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण १३ औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक क्षेत्राचे एकूण उत्पादन १४३९८४१३८५० मेट्रीक टन इतके आहे.

तक्ता क्र. १.३
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राचे उत्पादन

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | २०००-०१ चे उत्पादन (मेट्रीक टन) | २००९-१० चे उत्पादन (मेट्रीक टन) | २०००-०१ च्या तुलनेत २००९-१० मधील शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ठाणे | ३६१४९० | ४१२२७००० | ११३०४.७४ |
| २. | तारापूर आणि अतिरिक्त तारापूर | ६६४५२७८३५ | ५३३७०२४५१३ | ७०३.१३ |
| ३. | डोंबिवली | ४९४३९८३३९ | ११४९९५२६९६ | १३२.५९ |
| ४. | मीरा | १७४१९७७ | ६३८८३४६६ | ३५६७.०७ |
| ५. | अंबरनाथ (अंबरनाथ-बदलापूर रोड) | २५७९८५९० | ९५९४६७६६० | ३६१९.०७ |
| ६. | अंबरनाथ (आनंदनगर) | ३४१४५१४९ | १४४८४१४३५ | ३२४.१९ |
| ७. | अतिरिक्त अंबरनाथ (बोहोनोली) | ४२१६ | ३५५७१ | ८३३७.४० |
| ८. | बदलापूर | १७४१९७६६ | १५९१३५१२१ | ८१३.५३ |
| ९. | कल्याण- भिवंडी | ७१९३५८५ | १७३९९६४३ | ११९.८७ |
| १०. | अतिरिक्त कल्याण- भिवंडी | - | - | - |
| ११. | मूरबाड | ५९६१७०१ | ४०६५२६५३९ | ६७१८.९६ |
| १२. | अतिरिक्त मूरबाड (खूदावली) | ९१४३५४७ | ३५७०००००० | ३८०४.३९ |
| १३. | ठाणे - तुर्भे खाडी (T.T.C.) | ७५६६३९८० | ५७६१६०००५० | ७५१४.७१ |
| | एकूण | १३३७०८०१७५ | १४३९८४१३८५० | - |

स्रोत : MSME Development Institute, Ministry of MSME, Govt. of India, Andheri(E), Mumbai, 2000-01 and 2010-11 Report.

९ ठाणे जिल्ह्यातील उद्योजकांच्या समस्या

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योगांना आवश्यक असणाऱ्या फक्त पायाभूत सोयी सुविधा पूरविते. वित्तीय सेवा -सुविधा, कुशल कामगारांची पूर्तता याविषयी कोणतीही मदत महामंडळ उद्योजकांना करीत नाही.
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योजकांना कोणत्याही प्रकारचा कच्चा माल पूरवू शकत नाही.
३. सरकारने उद्योजकांसाठी आखलेली वेगवेगळी विकासात्मक धोरणे आणि ठाणे जिल्हा एम. आय. डी. सी. यांच्यात समन्वय दिसून येत नाही.
४. उत्पादित मालाच्या वाहतुकीत आणि विक्री व्यवस्थेत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योजकांना कोणतेही सहाय्य करत नाही.
५. उद्योजकांना आपला उद्योग प्रस्ताव सादर करण्यासाठी खूप जास्त कागदपत्रे आणि नाहरकत प्रमाणपत्रे सादर करावी लागतात. ही कागदपत्रे गोळा करण्यास उद्योजकांना कमीत कमी दोन वर्षाचा कालावधी जागतो.
६. उत्पादन प्रक्रिया सुरळीत चालू राहावी म्हणून महामंडळ उद्योजकांना कोणत्याही प्रकारचे सहाय्य करीत नाही.
७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने फक्त स्वत:च्या उदि्दष्टपूर्तीलाच अधिक महत्त्व दिले आहे. उद्योजकांच्या उदि्दष्टांचा महामंडळाने काहीच विचार केलेला नाही.
८. उत्पादक आणि ग्राहक यांच्यातील मध्यस्थांचे उच्चाटन करण्याची कोणतीही व्यवस्था महामंडळाकडे नाही.

## १० शिफारशी

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सध्याची कार्यपद्धती, प्रगती, यश-अपयश आणि उद्योजकांच्या समस्या विचारात घेता महामंडळाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी पुढील शिफारशी करता येतील :

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पायाभूत सोयी-सुविधांची निर्मिती करण्यासाठी पुरेशा कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे आवश्यक आहे.
२. उद्योजकांच्या उत्पादित मालास योग्य किंमत मिळावी म्हणून महामंडळाने त्यांच्या उत्पादनाची प्रदर्शने भरवली पाहिजे.
३. ज्या उद्योगांत ५०० पेक्षा अधिक कामगार आहेत अशा उद्योगांत १९४८ च्या कामगार कायदा कलम (४८) नुसार कल्याणकारी अधिकाऱ्याची नियुक्ती महामंडळाकडून करण्यात यावी.
४. उत्पादित माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचावा आणि उद्योजकांना त्यांच्या उत्पादनास योग्य किंमत मिळावी म्हणून महामंडळाने आपल्या क्षेत्रात ग्राहक बाजारपेठेची उभारणी केली पाहिजे.
५. महामंडळातील अधिकाऱ्यांनी उद्योजकांना बँक व्यवहार, वस्तूंचे विपणन, उत्पादनाच्या नवीन पध्दती, मालाची जाहिरात यावावत योग्य असे मार्गदर्शन करावे.

थोडक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामुळे उद्योजकांना मुबलक प्रमाणात पायाभूत सोयी-सुविधांची उपलव्धता होते. परंतु क्लीष्ट कार्यपध्दतीमुळे महामंडळ उद्योजकांना पर्याप्त प्रमाणात मदत करू शकत नाही. म्हणून महामंडळाने आपल्या कामात सातत्य ठेवावे असे केल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिकीकरणाची गती वाढविण्याचे आणि रोजगार निर्मितीचे एक प्रभावी साधन ठरू शकेल.

## संदर्भ सूची

१. Mishra, S. K. and Puri, V. K. (2004): Indian Industrial Economy, Himalaya Publishing House, New Delhi.
२. Palsapure, D. P. (2004): Industrial Development of Maharashtra State, Himalaya Publishing House, Delhi.
३. पत्की, अ. द. (१९९२): औद्योगिक अर्थशास्त्र, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
४. रायखेलकर आणि खेडकर (१९९९): औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या बूक पब्लिशर्स, औरंगाबाद.
५. सवदी, ए. बी. (२००७): द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे.
६. DCMSME Development Institute, Government of India, Andheri (E) Mumbai, 2010-11, Report.
७. Maharashtra Development Report (2007): Govt. of Maharashtra Publications.
८. ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, मार्च २०१०.
९. ठाणे जिल्ह्याची संक्षिप्त सांख्यिकी (२००५).
१०. wwww.eethanedn1midcindia.org
११. www.midcindia. org
१२. wwww.msme.in